# भारतातील केंद्र-घटकराज्य संबंध


ऐश्वर्या धनवडे

https://orcid.org/0000-0001-7417-4642

aishd06@gmail.com



।। आलोक ।।

पुष्प पहिले

२४ जानेवारी, २०२१


## अनुक्रमणिका


१ भारतीय संघराज्य पद्धतीची वैशिष्ट्ये ३

२ भारतातील घटकराज्यनिर्मितीची प्रक्रिया ५

३ विविध राज्यांसाठीच्या काही तरतुदी ८

४ समित्या व आयोगांचे योगदान १२

५ निष्कर्ष १९

भारताच्या संविधानातील पहिल्या कलमात इंडिया, अर्थात भारत, हा राज्यांचा संघ असेल तर भारताचे राज्यक्षेत्र हे राज्यांची राज्यक्षेत्रे, पहिल्या अनुसूचीत निर्दिष्ट असलेली संघराज्यक्षेत्रे आणि (भविष्यात) संपादित केली जातील अशी अन्य राज्यक्षेत्रे मिळून बनलेले असेल, असा उल्लेख आहे.[१] याचे सर्वसाधारणपणे दोन अर्थ होतात. त्यातला पहिला अर्थ असा की भारतीय राज्यपद्धतीतील राज्ये ही राज्यकारभाराच्या दृष्टीने आखलेली घटकराज्ये आहेत. अमेरिकेचे संघराज्य हे ५० राज्ये एकत्र येऊन तयार झालेले संघराज्य आहे. तेथील राज्यांना स्वायत्तता आहे. याउलट भारतीय राज्यपद्धतीमध्ये आधी संघराज्य अस्तित्वात आले आणि मग राज्यक्षेत्रांची निर्मिती झाली. वरील विधानाचा दुसरा अर्थ असा की भारतीय संविधान कलम २ आणि ३ नुसार संसद तिला योग्य वाटेल त्या अटी व शर्तींवर नवीन राज्ये संघराज्यांमध्ये दाखल करून घेऊ शकते किंवा स्थापन करू शकते, तसेच कोणत्याही राज्यापासून एखादे राज्यक्षेत्र वेगळे करून किंवा दोन व अधिक राज्ये (त्यांचा भार) एकत्र जोडून, अथवा कोणतेही राज्यक्षेत्र दुसऱ्या राज्याशी जोडून नवीन राज्य निर्माण करू शकते. तसेच कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढवणे, कोणत्याही राज्याचे क्षेत्र घटवणे, कोणत्याही राज्यांच्या सीमांमध्ये फेरफार करणे आणि कोणत्याही राज्याच्या नावामध्ये फेरफार करणे याचे अधिकार संसदेला आहेत. याचाच अर्थ असा की भारतीय घटकराज्ये संघराज्यापासून फुटून स्वतंत्र होऊ शकत नाहीत[२]. अशा बाबतची कोणतीही तरतूद संविधानात आढळत नाही.

वरील तरतुदींची पाळेमुळे भारतीय स्वातंत्र्यसंग्राम आणि पुढे भारत-पाकिस्तान फाळणी यामध्ये असलेली दिसून येतात. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यासोबतच अखंड भारताची फाळणी होऊन स्वतंत्र पाकिस्तान जन्माला आला. याच काळात अनेक फुटीरतावादी वृत्ती डोकं वर काढत होत्या. अशा परिस्थितीत भारताचे संघराज्य एकत्र टिकवून ठेवणे हे तत्कालीन सरकारसमोरील आव्हान होते. जम्मू-काश्मीर, जुनागढ, हैद्राबाद

[१]भारताचे संविधान (इंग्रजी-मराठी द्विभाषी आवृत्ती) २०१४, कलम १.
[२]राजा १९९१, पृ. १५३-१६४.

यांचा प्रश्न, संस्थानांचे भारतातील राजकीय स्थान आणि भविष्य, उर्वरित भारतामध्ये होणाऱ्या भाषावार प्रांतरचनेवर आधारित राज्यानिर्मितीच्या चळवळी, फाळणीनंतर भारतामध्ये आलेल्या नागरिकांना भारतात सामील करून घेणे आणि भारताच्या दोन सीमांवर असलेल्या दोन पाकिस्तानांचे आव्हान यासोबतच स्वतंत्र द्रविडनाडूच्या मागणीचा जोर तसेच खलिस्तानी चळवळी, ईशान्येकडील राज्यांमधला असंतोष हे कळीचे मुद्दे त्यावेळी भारतासमोर होते. वरील सर्व मुद्दे लक्षात घेता नव्याने निर्माण झालेला भारत अल्पावधीतच असंख्य तुकड्यांमध्ये विभागला जाईल अशी भीती आणि चिंता अनेकांनी व्यक्त केलेली होती. आज ७३ वर्षांच्या प्रदीर्घ काळात भारतातील लोकशाही तगून राहिली आहे आणि २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेश[३] यांच्यासह भारताचे संघराज्य एकसंध आहे.

# १ भारतीय संघराज्य पद्धतीची वैशिष्ट्ये

ब्रिटिशांचे शासन हे अत्यंत केंद्रित आणि एकात्मक पद्धतीचे होते[४]. त्यामुळे सुरुवातीला संविधानकर्त्यांचा कल संघराज्य पद्धतीकडे होता, परंतु फाळणीनंतर एकराज्य शासनपद्धतीचे महत्त्व अधोरेखित झाले. याचाच परिणाम म्हणून संविधानकर्ते “बळकट” केंद्र या संकल्पनेवर ठाम झाले. याबाबतची प्रतिक्रिया युनियन पॉवर कमिटीच्या ५ जुलै, १९४७ रोजी मांडलेल्या दुसऱ्या अहवालात स्पष्टपणे मांडलेली आहे; ती पुढीलप्रमाणे- आता फाळणी हे सर्वमान्य सत्य आहे, तर आम्ही एकमताने असे मांडतो की या देशाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने शांतता स्थापित करणारे वा महत्त्वाच्या मुद्द्यांवर समन्वय साधण्यासाठी उपयुक्त असे संघराज्य निर्माण करताना कमकुवत संघराज्य निर्माण करणे धोकादायक आहे. त्यामुळे संविधानाने प्रदान केलेले भक्कम केंद्र असलेले संघराज्य सर्वोत्तम आहे[५].

[३]२०२० डिसेंबरनुसार.
[४]कश्यप २००१, पृ. २७८.
[५]सरकारिया, शिवरामन व सेन १९८८.

भारतीय राज्यपद्धती एकराज्य शासन आणि संघराज्य शासन या दोहोंचे गुणधर्म दाखवते. सामान्य परिस्थितीत ती संघराज्यपद्धती असते, परंतु आणीबाणीसारख्या राष्ट्रीय आपत्तीच्या काळात ती संपूर्णपणे एकराज्य पद्धती होते. संघराज्य पद्धतीप्रमाणे भारतामध्ये केंद्र आणि घटकराज्य यांची दुहेरी राज्यव्यवस्था आहे. संविधानामध्ये संघसूची, राज्यसूची आणि समवर्ती सूचीद्वारे[६] केंद्र आणि घटकराज्ये यांच्यामध्ये अधिकारांचे वाटप केलेले आहे. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, अणुऊर्जा, रेल्वे इत्यादी एकूण १०० विषय (मूलत: ९७) संघसूचीत समाविष्ट केलेले आहेत, तर सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस, सार्वजनिक आरोग्य, स्थानिक प्रशासन, जमिनी व इमारती यांच्यावरील कर इत्यादी ६१ (मूलत: ६६) विषयांचा राज्यसूचीत समावेश होतो. उर्वरित एकूण ५२ विषय (मूलत: ४७) समवर्ती सूचीत दिलेले आहेत.[७] समवर्ती सूचीतील समाविष्ट विषयांवर प्रभावी अंमलबजावणीकरिता केंद्र आणि घटकराज्ये यांच्यात एकमत होणे गरजेचे आहे. या सूचीमधील समाविष्ट विषयांवर केंद्र आणि घटकराज्ये या दोघांनाही कायदा करण्याचा अधिकार आहे, परंतु जर केंद्र आणि घटकराज्ये यांनी एकाच विषयावर केलेल्या कायद्यांत तफावत जाणवली, तर केंद्राने केलेला कायदा वैध मानला जातो. राज्यसूचीमध्ये समविष्ट असलेल्या विषयांवर घटकराज्यांचा संपूर्ण अधिकार नाही. संघराज्यपद्धतीत संविधान हा भूमीचा सर्वोच्च कायदा मानला जातो. संविधानाची श्रेष्ठता अबाधित राखली जाते. भारताला लिखित संविधान आहे. भारतीय संविधानात सद्यस्थितीत उद्देशिका, २५ भागांमध्ये विभागलेली ४६५ कलमे आणि १२ अनुसूची यांचा समावेश आहे. भारतीय संविधान दुष्परिवर्तनीय असणे आणि परिवर्तनसुलभ असणे ही दोन्ही वैशिष्ट्ये दाखवते. संपूर्ण भारताला एकच संविधान आहे याचाच अर्थ घटकराज्यांना स्वत:चे वेगळे संविधान नाही (ऑगस्ट २०१९ पूर्वी जम्मू आणि काश्मीर राज्याला स्वतःचे संविधान होते).

[६] भारताचे संविधान (इंग्रजी-मराठी द्विभाषी आवृत्ती) २०१४, सातवी अनुसूची पृ. २१२-२२२.
[७] लक्ष्मीकांत २०१५, पृ. १३.२.

भारताचा प्रबळ केंद्राकडे विशेष कल आहे, त्यामुळे घटकराज्ये संघराज्यातून फुटून जाऊ शकत नाहीत. यालाच विनाशी राज्यांचा अविनाशी संघ असे[८] ह्यांनी म्हटले आहे. यासोबतच भारतामध्ये संपूर्ण देशासाठी एकच नागरिकत्व आहे. अमेरिकेसारखे विविध राज्यांचे स्वतःचे नागरिकत्व ही संकल्पना भारतीय राज्यांमध्ये अस्तित्वात नाही. भारताला स्वतंत्र आणि एकात्मीकृत न्यायमंडळ आहे. या न्यायमंडळाच्या सर्वोच्चस्थानी सर्वोच्च न्यायालय, त्या खालोखाल उच्च न्यायालये आणि इतर कनिष्ठ न्यायालये येतात. भारताला स्वतःची अशी एकात्मीकृत निवडणूक यंत्रणा, एकात्मीकृत महालेखा परीक्षण यंत्रणा आणि अखिल भारतीय प्रशासन सेवा आहे. लोकसभा आणि राज्यसभा यांचा समावेश असलेली संसद हे द्विगृही विधिमंडळ भारताला आहे. राज्यांमधील क्षेत्रीय मतदारसंघामधून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेले प्रतिनिधी लोकसभेत निवडून दिले जातात, तर राज्यसभेत घटकराज्यांना प्रतिनिधित्व दिले जाते.

भारतीय राज्यपद्धतीची घडण समजून घेण्यासाठी घटकराज्यांच्या निर्मितीची प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. या सोबतच सद्यस्थितीतील घटकराज्ये व त्यांना अनुसरून येणाऱ्या असममिती अभ्यासणे तितकेच महत्वाचे आहे.

## २ भारतातील घटकराज्यनिर्मितीची प्रक्रिया

ब्रिटिशकालीन भारतामध्ये ब्रिटिशांच्या आधिपत्याखालील प्रदेश, संस्थाने, फ्रेंच आणि पोर्तुगीज यांच्या वसाहतीखालील प्रदेश अशी विभागणी होती. ब्रिटिशांच्या अंमलाखालील प्रदेशांची राज्यकारभाराच्या सोयीसाठी विविध इलाख्यांमध्ये विभागणी केलेली होती. संस्थानांना नाममात्र स्वायतता होती व मूळ कारभार ब्रिटिशांच्या हाती होता. तब्बल ५५० संस्थाने भारतामध्ये अस्तित्वात होती. या संस्थानांची संख्या ५२१ पासून ५६५ इथपर्यंत मानली जाते[९]. भारताला स्वातंत्र्य

[८] राजा १९९१, पृ. १५३-१६४.
[९] गुहा २००७, पृ. ३६.

मिळाल्यापासून ते भारताचे प्रजासत्ताक निर्माण होईपर्यंत ३ वर्षांच्या काळात संस्थानांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया पार पडली. यात संस्थानांचा आकार, भौगोलिक स्थान याचा विचार करत काही संस्थानांची नवीन राज्यांमध्ये पुनर्निर्मिती झाली तसेच काही संस्थाने आधीपासून अस्तित्वात असलेल्या इलाख्यांना जोडली गेली. धर आयोग, फ़ज़ल अली आयोग, जेव्हीपी आयोग व राज्यपुनर्रचना आयोग यांची स्थापना राज्यांच्या पुनर्रचनेच्या मुद्द्यावर उपाय शोधण्यासाठी केली गेली.

१ ऑक्टोबर १९५३ रोजी तेलुगू भाषिक असलेल्या मद्रास इलाख्याच्या भागापासून आंध्र राज्याची निर्मिती झाली. फ्रेंचांची वसाहत असलेला येनेम, कारिकल, माहे आणि पुद्दुचेरी हे प्रदेश एकत्र करून, १ नोव्हेंबर, १९५४ मध्ये पुद्दुचेरी हा केंद्रशासित प्रदेश निर्माण झाला. राज्यपुनर्रचना आयोगाच्या अहवालानुसार १९५६ मध्ये राज्यांची भाषिक प्रांतवार रचनेच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. त्यानंतर आधीचे आंध्र राज्य आणि तेलुगू भाषिक हैद्राबादचा प्रदेश एकत्र करून, आंध्र प्रदेशाची निर्मिती झाली. भाषिक चळवळी आणि भाषावार प्रांतरचना या विषयावरून आंध्र प्रदेशामध्ये दंगली घडून आल्या व यातच पोट्टी श्रीरामलू यांच्या आमरण उपोषणाच्या ५८ व्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला आणि तेलुगू भाषिक चळवळीने जोर धरला. परिणामी जनक्षोभ आणि जनरेटा लक्षात घेऊन, सरकारला आंध्रप्रदेशाची निर्मिती करावी लागली.

मद्रास इलाख्यातील मलबार प्रदेशात त्रवणकोरचे राज्य मिसळून, सध्याचे केरळ राज्य निर्माण झाले. पटियाला आणि पूर्व पंजाबचा भाग एकत्र होऊन पंजाब राज्य अस्तित्वात आले. विंध्यप्रदेश, भोपाळ आणि मध्यभारत इलाखा यांच्यापासून मध्य प्रदेश हे राज्य निर्माण झाले. म्हैसूर संस्थानामध्ये पश्चिम हैद्राबाद आणि कुर्ग हे प्रदेश विलीन केले गेले. पुढे १९७३ मध्ये म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक असे ठेवले गेले. बॉम्बे इलाख्यामध्ये हैद्राबादमधील मराठवाडा प्रदेश, सौराष्ट्र आणि कच्छ व मध्यप्रदेशमधील नागपूर हे प्रदेश मिसळले गेले. पुढे १ मे १९६० मध्ये बॉम्बे राज्य विभागून महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये निर्माण झाली. मुंबई

ही महाराष्ट्राची राजधानी झाली. मध्यप्रदेश, बॉम्बे इलाख्याचा काही भाग आणि अजमेर राज्य राजस्थानमध्ये मिसळले गेले. ११ ऑगस्ट १९६१ ला दादरा आणि नगर हवेली भारतीय संघराज्यात विलीन झाले. १ डिसेंबर १९६३ रोजी नागालँड राज्याची निर्मिती झाली. १९६६ मध्ये पंजाब पुनर्रचना कायद्यानुसार १ नोव्हेंबर १९६६ रोजी हरियाणा राज्य निर्माण झाले. तर पंजाबच्या उत्तरेकडील प्रदेश एकत्र करून, हिमाचल प्रदेशची निर्मिती करण्यात आली. चंडीगढ हा केंद्रशासित प्रदेश असून पंजाब आणि हरियाणा या राज्यांची राजधानी आहे. १९६८ मध्ये मद्रास हे नाव बदलून तामिळनाडू ठेवण्यात आले. १९७३ रोजी लक्षद्वीप मिनिकोय आणि अमिनदिवी बेटांना एकत्र करून, लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती झाली. २१ जानेवरी १९७२ रोजी ईशान्य भारतातील मेघालय, मणिपूर आणि त्रिपुरा ही घटकराज्ये अस्तित्वात आली. सिक्किमचे स्वतंत्र राष्ट्र १६ मे १९७५ रोजी भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि सिक्किम हे २२ वे राज्य गणले गेले. मिझोरम आणि अरुणाचल प्रदेश २० फेब्रुवारी १९८७ रोजी राज्ये म्हणून अस्तित्वात आली. गोवा व दीव-दमण या केंद्रशासित प्रदेशापासून गोवा वेगळा होऊन त्याला राज्याचा दर्जा दिला गेला, तर दमण आणि दीव हे केंद्रशास

प्रदेश राहिले. नोव्हेंबर २००० मध्ये मध्य प्रदेशातून छत्तीसगढ, बिहारमधून झारखंड आणि उत्तरप्रदेशातून उत्तरांचल हे प्रदेश वेगळे होऊन छत्तीसगढ, झारखंड आणि उत्तरांचल ही राज्ये अस्तित्वात आली. २०१४ मध्ये आंध्रप्रदेशापासून तेलंगण वेगळे झाले. ऑगस्ट २०१९ मध्ये केंद्र सरकारने संवैधानिक बदल करून ३७० कलम रद्द केले व जम्मू-काश्मीर या राज्याचे जम्मू-काश्मीर व लडाख या दोन केंद्रशासित प्रदेशात रूपांतर केले.[१०]

भारतामध्ये समाविष्ट असलेली विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेश यांच्यात भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विविधता आढळून येते. त्यामुळे सर्वांसाठी एकच माप हा नियम भारतामध्ये लागू करता येत नाही. भारतीय

[१०] दुवा : https://www.mapsofindia.com/maps/india/formation-of-states.html

संघराज्यामध्ये मुळातच काही प्रमाणात असममिती दिसून येते. भारतामधील काही राज्यांना विशेष राज्यांचा दर्जा दिलेला आहे. हा विशेष दर्जा प्राप्त झालेल्या राज्यांमधील अविकसित आणि मागास प्रदेश व त्या प्रदेशातील आणि इतर लोकसंख्या यांचा विकास साधणे हे उद्दिष्ट आहे, पण असे असतानासुद्धा या असममितीय व्यवस्थेमुळे उर्वरित राज्यांनी विशेष राज्यांचा दर्जा किंवा विशेष तरतुदी करून घेण्याचा प्रयत्न अनेकदा झालेला दिसतो.

# ३ विविध राज्यांसाठीच्या काही तरतुदी

अमेरिकी सिनेटमध्ये सर्व राज्यांना समान प्रतिनिधित्व दिले गेले आहे, पण भारतीय राज्यसभेत राज्यांमधील लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवलेल्या आहेत. संविधानातील चौथ्या अनुसूचीचा विचार करता उत्तर प्रदेशसारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राज्याला ३१ जागा नेमून दिलेल्या आहेत. त्याखालोखाल महाराष्ट्र (१९), आंध्रप्रदेश (१८), तामिळनाडू (१८), बिहार (१६) आणि पश्चिम बंगाल (१६) ह्या राज्यांना त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेऊन, जागा नेमून दिलेल्या आहेत. याउलट नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, मेघालय, सिक्कीम, मिझोरम, अरुणाचल प्रदेश आणि पुद्दुचेरी या घटकराज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना प्रत्येकी केवळ १ जागा नेमून दिली आहे. केंद्रशासित प्रदेशांचा विचार करता वेगळ्या स्तरावरील असममिती प्रकर्षाने दिसून येते. विविध केंद्रशासित प्रदेश हे विविध कारणांसाठी निर्माण केले गेले. अंदमान निकोबार आणि लक्षद्वीप ही बेटे भारताच्या मूळ भूमीपासून समुद्राने विलग आहेत. दादरा आणि नगर हवेली, दमण व दीव आणि पुद्दुचेरी हे केंद्रशासित प्रदेश त्यांना लगत असलेल्या राज्यांमध्ये त्यांच्या सांस्कृतिक आणि इतर विविधतेमुळे समाविष्ट करता येणार नाहीत.

कलम ३७० अंतर्गत जम्मू आणि काश्मीर या राज्याला विशेष राज्याचा दर्जा दिला गेला होता. या राज्याला स्वत:चे संविधान होते, परंतु ऑगस्ट २०१९ रोजी

शासनाच्या अधिसूचनेद्वारे जम्मू काश्मीरला असलेला विशेष राज्याचा दर्जा काढला गेला.[११] आणि जम्मू काश्मीर व लडाख यांना केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा दिला गेला. असे असले तरीसुद्धा इतर राज्यांना कलम ३७१ अंतर्गत दिलेला विशेष दर्जा कायम आहे.

विशेष राज्यांचा दर्जा असलेल्या राज्यांबाबत संविधानात आलेल्या तरतुदी पुढीलप्रमाणे.[१२]

**महाराष्ट्र आणि गुजरात** कलम ३७१ अंतर्गत महाराष्ट्र व गुजरातच्या राज्यपालांवर अनुक्रमे विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र व सौराष्ट्र, कच्छ, उर्वरित गुजरात यांच्यासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करणे, सबंध राज्याच्या गरजा लक्षात घेऊन, विकासखर्चासाठी निधीचे समन्याय वाटप करणे आणि उक्त सर्व क्षेत्रांबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यांच्यासाठी पर्याप्त सोयी व राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था तयार करणे या विशेष जबाबदाऱ्या राष्ट्रपती सोपवू शकतो.

**नागालँड** कलम ३७१-क अंतर्गत नागांच्या धार्मिक किंवा सामाजिक प्रथा, रूढिप्राप्त कायदा व कार्यपद्धती, दिवाणी व फौजदारी न्यायदान तसेच जमीन व तिच्यातील साधनसंपत्ती यांचे स्वामित्व व हस्तांतरण यांबाबत संसदेचा कोणताही अधिनियम नागालँडच्या राज्याला लागू होणार नाही. तसेच नागालँड राज्याच्या निर्मितीच्या लगतपूर्वी नागा हिल्स त्यूएनसांग क्षेत्रात उद्भवणारी अंतर्गत अशांतता लक्षात घेता, त्या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था यांच्याबाबत राज्यपालावर विशेष जबाबदारी सोपवलेली आहे. कलम ३७१-क(ग) नुसार अनुदानाच्या कोणत्याही मागणीसंबंधी शिफारस करताना नागालँडचा राज्यपाल कोणत्याही विशिष्ट सेवेसाठी किंवा

[११] भारत सरकार का राजपत्र, भाग २, खंड ३, उपखंड (i) २०१९.
[१२] भारताचे संविधान (इंग्रजी-मराठी द्विभाषी आवृत्ती) २०१४, पृ. १५९-१६८.

प्रयोजनासाठी भारत सरकारने भारताच्या एकत्रित निधीतून पुरविलेला कोणत्याही पैशाचा समावेश त्या सेवेशी किंवा प्रयोजनासाठी संबंधित असलेल्या अनुदानार्थ मागणीत असेल याची सुनिश्चिती करेल.

**आसाम** कलम ३७१-ख नुसार राष्ट्रपतीला आसाम राज्याबाबत काढलेल्या आदेशाद्वारे सहाव्या अनुसूचीतील परिच्छेद २०ला जोडलेल्या तक्त्यातील भाग एक (उत्तर कछार डोंगरी जिल्हा, कार्बी अंगलांग जिल्हा, बोडोलँड प्रादेशिक क्षेत्र जिल्हा) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जनजातिक्षेत्रातून निवडून आलेले त्या राज्याच्या विधानसभेचे सदस्य आणि त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या संख्येइतके त्या विधानसभेचे अन्य सदस्य मिळून बनलेली, त्या विधानसभेची समिती घटित करण्याकरिता, तिची कार्ये करण्याकरिता आणि अशी समिती घटित करण्यासाठी व तिचे कार्य योग्यप्रकारे चालण्यासाठी त्या विधानसभेच्या कार्यपद्धती नियमांत फेरबदल करण्याकरिता तरतूद करता येईल.

**मणिपूर** कलम ३७१-ग अंतर्गत, राष्ट्रपतीला मणिपूर राज्याबाबत काढलेल्या आदेशाद्वारे त्या राज्याच्या डोंगरी क्षेत्रामधून निवडून आलेले त्या राज्याच्या विधानसभेचे सदस्य मिळून बनलेली समिती घटित करण्यातही व तिची कार्ये यांकरिता, शासकीय कामकाजांत नियमांत आणि त्या राज्याच्या विधानसभेच्या कार्यपद्धतीत-नियमांत फेरबदल करण्याकरिता आणि अशा समितीचे कार्य योग्य प्रकारे चालण्याची निश्चिती करण्याकरिता राज्यपालवर विशेष जबाबदारी सोपवण्याबाबत तरतूद करता येईल.

**आंध्र प्रदेश** राज्याच्या गरजा लक्षात घेऊन, सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत आणि शिक्षणाच्या बाबतीत राज्याच्या वेगवेगळ्या भागातील लोकांना समन्याय संधी आणि सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता राष्ट्रपतीला त्या राज्याबाबत आदेश करून, त्याद्वारे तरतूद करता येईल, अशी तरतूद कलम

३७१-घ मध्ये दिलेली आहे. तर कलम ३७१ अंतर्गत संसदेला आंध्र प्रदेश राज्यात विद्यापीठ स्थापन करण्याची तरतूद आहे.

**सिक्कीम** कलम ३७१-च (छ) अन्वये सिक्कीमच्या राज्यपालावर शांतता राखण्याबाबत आणि सिक्कीमच्या जनतेच्या निरनिराळ्या घटकांची सामाजिक व आर्थिक उन्नती सुनिश्चित करण्यासाठी समन्याय व्यवस्था करण्याबाबत विशेष जबाबदारी सोपवलेली आहे.

**मिझोरम** कलम ३७१-छ अन्वये मिझोंच्या धार्मिक किंवा सामाजिक प्रथा, रूढिप्राप्त कायदा व कार्यपद्धती, दिवाणी व फौजदारी न्यायदान तसेच जमीन व तिच्यातील साधनसंपत्ती यांचे स्वामित्व व हस्तांतरण यांबाबत संसदेचा कोणताही अधिनियम, मिझोरम विधानसभेने ठरावाद्वारे तसे ठरविल्याशिवाय मिझोरम राज्याला लागू होणार नाही.

**अरुणाचल प्रदेश** राज्यातील कायदा व सुव्यवस्था याबाबत राज्याच्या राज्यपालावर कलम ३७१-ज अंतर्गत विशेष जबाबदारी देण्यात आली आहे, तसेच त्यासंबंधीची कार्ये पार पाडताना करावयाच्या कारवाईबाबत राज्यपाल मंत्रिपरिषदेशी विचारविनिमय केल्यानंतर आपली वैयक्तिक निर्णयशक्ती राज्यपाल वापरेल अशीही तरतूद आहे.

**गोवा** कलम ३७१ झ अंतर्गत गोवा राज्याची विधानसभा, तीसपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल.

**कर्नाटक** कलम ३७१ अंतर्गत राष्ट्रपती पुढील बाबींसाठी राज्यपालावर विशेष जबाबदारीची तरतूद करू शकेल. त्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे -

१. मंडळाच्या कामकाजावरील अहवाल प्रत्येक वर्षी राज्याच्या विधानसभेसमोर ठेवण्यात येईल. या तरतूदींसह हैदराबाद-कर्नाटक प्रदेशासाठी स्वतंत्र विकासमंडळाची स्थापना.

२. संपूर्णपणे राज्याच्या गरजांना अधीन राहून उक्त प्रदेशावरील विकास विषयक खर्चासाठी निधीचे समन्याय वाटप.

३. संपूर्णपणे राज्यांच्या गरजांना अधीन राहून, सार्वजनिक रोजगार, शिक्षण आणि व्यवसाय प्रशिक्षण याबाबत उक्त प्रदेशातील लोकांसाठी समन्याय संधी आणि सुविधा.

## ४ समित्या व आयोगांचे योगदान

भारतीय राज्यव्यवस्थेला 'संघराज्यवत्' असे अनेकदा संबोधित केले गेले आहे. 'संघराज्यवत्' म्हणजे केंद्रीकरणाकडे कल असलेली संघराज्य व्यवस्था होय. अशी व्यवस्था जरी आणीबाणीसारख्या राष्ट्रीय आपत्तीच्या काळात केंद्रीकृत रूप धारण करत असली, तरी तिला संपूर्णपणे एकराज्य राज्यपद्धती म्हणता येत नाही. भारतीय संघराज्य व्यवस्था ही सहकारी, असममितीय, संसदीय, कार्यकारी, स्पर्धात्मक, उदयोन्मुख, अनिच्छुक, लोकमान्य, संघराज्यवत्, पुनर्रचित अशा विविध गुणधर्मांनी ओळखले जाते.[१३] सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीच्या निकालात भारतीय संघराज्यव्यवस्थेला 'उभयचर व्यवस्था' म्हटले आहे.[१४] बऱ्याचदा राज्यांवरील केंद्राचे वर्चस्व हे केंद्र-घटकराज्य संबंधांबाबत पेच निर्माण करणारे आहे. केंद्र आणि घटकराज्य यांच्यातील संबंध यांचा अभ्यास करण्यासाठी घटकराज्य आणि केंद्र पातळीवर अनेक समित्या, आयोगांची स्थापना केली गेली. त्यापैकी महत्त्वाच्या समित्या आणि आयोग यांची माहिती पुढे थोडक्यात दिलेली आहे.

**ॲडमिनिस्ट्रेटिव रिफॉर्म आयोग** [१५] केंद्र आणि घटकराज्य यांच्यातील संघर्ष आणि

[१३] कश्यप २००८, पृ. २०२.
[१४] पांडे २०१९.
[१५] लक्ष्मीकांत २०१५, पृ. १४.२.

पेच टाळण्यासाठी १९६० नंतर बरेच प्रयत्न झाले. १९६६ मध्ये मोरारजी देसाई (नंतरचे अध्यक्ष के. हनुमंतय्या) यांच्या अध्यक्षतेखालील घटित केलेला ६ सदस्यीय ॲडमिनिस्ट्रेटिव रिफॉर्म आयोग ही त्यामधली महत्वाची पायरी मानली पाहिजे. आर्कने मोतीलाल चिमणलाल सेटलवाड यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट घटित केला. या अभ्यासगटाने दिलेल्या अहवालानुसार आर्कने स्वतःचा अहवाल १९६९ रोजी केंद्र सरकारला प्रस्तुत केला. या अहवालामध्ये केंद्र घटकराज्य संबंधांबाबत २२ शिफारसी केलेल्या होत्या ज्यामध्ये संविधानातील कलम २६३ अंतर्गत आंतरराज्य परिषदेची निर्मिती, सामाजिक आणि प्रशासनाचा दीर्घ अनुभव असलेल्या निष्पक्षपाती व्यक्तीची राज्यपाल म्हणून नेमणूक, घटकराज्यांना अधिकाधिक विकेंद्रीत अधिकार, घटकराज्यांचे केंद्रावरील आर्थिक अवलंबित्व कमी करण्यासाठी राज्यांना अधिकाधिक वित्तीय संसाधनांचे वाटप इत्यादींचा समावेश होता. परंतु यापैकी एकाही शिफारसीवर कुठल्याही पद्धतीचा निर्णय केंद्राकडून घेतला गेला नाही.

**राजमन्नार समिती** [१६] केंद्र आणि घटकराज्य यांमधील संबंध आणि राज्यांना जास्तीत जास्त स्वायतता मिळावी यासाठी कराव्या लागणाऱ्या घटनादुरुस्त्या यावर सखोल अभ्यासपूर्ण उपाय काढण्यासाठी १९६९ मध्ये तामिळनाडू राज्याच्या द्रमुक सरकारने डॉ. पी. व्ही. राजमन्नार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती घटित केली. या समितीने १९७१ साली सादर केलेल्या अहवालामध्ये केंद्र आणि राज्य संबंधामध्ये तणाव निर्माण करणारी कारणे मांडली गेली. ती कारणे पुढील प्रमाणे.

१. संविधानामधील विशेष तरतुदींनुसार घटकराज्यांच्या तुलनेत केंद्राला दिलेले गेलेले विशेष अधिकार.

[१६]लक्ष्मीकांत २०१५, पृ. १४.२.

२. केंद्र आणि घटकराज्यांमध्ये एकाच पक्षाचे असलेले वर्चस्व.

३. घटकराज्यांना मिळणारा अपुरा निधी आणि त्यामुळे घटकराज्यांचे केंद्रावरील वाढते अवलंबित्व.

४. केंद्रित नियोजन यंत्रणा आणि नियोजन आयोगाची भूमिका अहवालामधल्या काही महत्वाच्या शिफारसी

(अ) आंतरराज्य परिषद तात्काळ घटित करणे.

(आ) वित्त आयोग ही यंत्रणा कायमस्वरूपी करणे.

(इ) नियोजन आयोग रद्द करणे आणि त्या जागी वैधानिक यंत्रणा स्थापन करणे.

(ई) कलम ३५६, ३५७ आणि ३६५ या संविधानातून पूर्णपणे वगळणे.

(उ) केंद्रसूची आणि समवर्ती सूचीतील काही विषय राज्य सूचीत हस्तांतरित करणे.

(ऊ) राज्यपालाची मर्जी असेपर्यंत मंत्री पदे धारण करतील, ही संविधांनातील तरतूद वगळणे.

(ए) भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), (आयपीएस) आणि (आयएफएस) रद्द करणे. राजमन्नार समितीच्या शिफारसींकडे केंद्र शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले.

**आनंदपूर साहिब ठराव** [१७] पंजाबमधील आनंदपूर साहिब येथे झालेल्या बैठकीत अकाली दलाने राजकीय आणि धार्मिक मागण्या असलेला ठराव मंजूर करून घेतला. १९७३ साली झालेल्या या ठरावाला आनंदपूर साहिब ठराव असे म्हणतात. या ठरवामध्ये केंद्राचे कार्यक्षेत्र हे संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, संपर्क व्यवस्था आणि चलन इत्यादीपुरतेच मर्यादित असायला हवे आणि इतर

[१७] लक्ष्मीकांत २०१५, पृ. १४.३.

अधिकार हे घटकराज्यांना प्रदान करावे आणि खऱ्याअर्थी संविधानामध्ये संघराज्यपद्धती आणून सर्व घटकराज्यांना केंद्रात एकसमान प्रतिनिधित्व द्यावे, अशा पद्धतीची मागणी केली गेली.

**पश्चिम बंगालचे निवेदन** [१८] १९७७ मध्ये पश्चिम बंगाल सरकारने केंद्र घटकराज्य संबंधामधील निवेदन प्रकाशित करून केंद्राला पाठवले. या निवेदनातील शिफारसी पुढीलप्रमाणे.

१. संविधानातील 'यूनियन' (संघ) हा शब्द काढून त्याजागी फेडरल (संघराज्य) हा शब्द वापरावा.
२. केंद्राचे कार्यक्षेत्र हे संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, संपर्क व्यवस्था आणि चलन इत्यादीपुरतेच मर्यादित असायला हवे.
३. इतर अधिकार घटकराज्यांना प्रदान करावे.
४. कलम ३५६ आणि ३५७ (राष्ट्रपती राजवट) आणि ३६० (आर्थिक आणीबाणी) हे रद्दबातल ठरवावे.
५. नवीन राज्यांच्या निर्मितीसाठी किंवा विद्यमान राज्यांची पुनर्रचना करण्यासाठी केंद्राने संबंधीत घटकराज्याची संमती घेणे बंधनकारक असावे.
६. लोकसभेइतकेच समान अधिकार राज्यसभेलाही असावेत.
७. केंद्राला येणाऱ्या महसुलातील ७५% वाटा राज्यांना देण्यात यावा.
८. अखिल भारतीय प्रशासनिक सेवा रद्द कराव्यात व त्याजागी फक्त केंद्र आणि घटकराज्य यांच्यासाठीच्या प्रशासनिक सेवा असाव्यात.

पश्चिम बंगालचे हे निवेदन केंद्र सरकारने मान्य केले नाही.

[१८]लक्ष्मीकांत २०१५, पृ. १४.३.

१९६७ हे साल निवडणुकांमुळे विशेष गाजले. बिहार, हरियाणा, केरळ, मध्यप्रदेश, ओडिसा, तामिळनाडू, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये बिगर कॉंग्रेसी सरकारे अस्तित्वात आली. याच काळामध्ये अनेक राज्यांमधील युती सरकारे निवडून आली. याचाच परिपाक म्हणून केंद्र-घटकराज्य संबंध आणि राज्यांच्या स्वायत्ततेवरील केंद्राचे वर्चस्व या बाबतीत बिगर कॉंग्रेसी राज्यांमध्ये विचार मंथने सुरू झाली. पंजाबमधील शिरोमणी अकाली दल, आंध्रप्रदेशातील तेलुगू देसम पक्ष, पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि ईशान्येकडील राज्ये यांच्यामधून केंद्र-घटकराज्य संबंधावरील संविधानिक तरतुदींचे पुनरावलोकन व्हायला हवे, असा सूर धरू लागला. याच काळात जम्मू आणि काश्मीरचा प्रश्न पुन्हा डोकं वर काढू लागलेला होता. आर्क, राजमन्नार समिती, आनंदपूर साहिब ठराव आणि पश्चिम बंगालचे निवेदन यांच्या शिफारसींकडे केंद्राने संपूर्णपणे दुर्लक्ष केले. याच पार्श्वभूमीवर सरकारिया आयोग घटित करण्याचा निर्णय महत्वपूर्ण मानायला हवा.

**सरकरिया आयोग** [१९] १९८३ साली इंदिरा गांधी सरकारने केंद्र-राज्य संबंधांवरील सरकरिया आयोग घटित केला. केंद्र सरकारचा केंद्र-घटकराज्य संबंधांवरील प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारचा आयोग स्थापन करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. या आयोगाने २७ ऑक्टोबर १९८७ रोजी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना अहवाल प्रस्तुत केला. या आयोगाने राज्यपालाची भूमिका, राज्यांतर्गत पाणी वाटपाचा प्रश्न, शेती, जंगले, आणीबाणीच्या राष्ट्रीय आपत्ती अशा एकूण १९ विषयांवर २४७ शिफारसी केल्या. या आयोगाचा एकूण उद्देश केंद्र-घटकराज्य संबंधांवरील कार्यपद्धतीतील बारकावे तपासताना संविधान निर्मितीपासून आत्तापर्यंत झालेले सामाजिक आणि आर्थिक बदल समजून घेणे आणि त्यानुसार

[१९]सरकारिया, शिवरामन व सेन १९८८.

शिफारसी करणे हा होता.[२०] या आयोगाच्या शिफारसी पुढील प्रमाणे

१. राज्यांतर्गत पाणी वाटपाच्या प्रश्नाची तक्रार ही तक्रारदार घटकराज्याकडून दाखल केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतीच्या आत केंद्राने प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी न्यायाधिकरण स्थापन करावे.
२. कलम २६३ अंतर्गत कायमस्वरूपी आंतरराज्य परिषद स्थापन करावी.
३. केंद्रामधील सत्ताधारी पक्षातील नेता हा राज्यपाल म्हणून ज्या राज्यात त्या पक्षाची सत्ता नाही किंवा दोन किंवा अधिक पक्षांचे मिळून युती सरकार आहे अशा राज्यात नेमला जाऊ नये. राज्याच्या राज्यपाल निवडीबाबत पंतप्रधानाने उपराष्ट्रपती आणे लोकसभेचा सभापती यांच्याशी सल्लामसलत करावी.
४. मुख्यमंत्री निवडीमध्ये राज्यापालाने विधानसभेमध्ये ज्या पक्षाला किंवा दोन किंवा अधिक पक्षांची मिळून तयार झालेल्या युतीला स्पष्ट बहुमत असेल तर सत्तानिर्मितीसाठी पाचारण करावे.
५. कलम ३६५ अत्यंत निकडीच्यावेळेस शेवटचा उपाय म्हणून वापरावे.
६. भाषिक अल्पसंख्यांक आयोग पुनरुज्जीवित करावा.
७. त्रिभाषा सूत्राची योग्य ती अंमलबाजावणी करावी.

पी. व्ही. नरसिंहराव सरकारने सरकारिया आयोगाच्या काही शिफारसींच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केला. जून १९९६ साली केंद्रात देवेगौडा सरकारने या आयोगाच्या सर्वच शिफारसींची अंमलबाजवणी करण्याचा निर्णय घेतला. सरकारिया आयोगाने १९८३ साली अहवाल सादर केला. एप्रिल २००७ मध्ये माजी न्यायाधीश मदन मोहन पूंछी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र-घटकराज्य संबंधांवरील दुसरा आयोग घटित केला गेला. सरकरिया

[२०]सरकारिया, शिवरामन व सेन १९८८, खंड १, प्रकरण १, १.१.०१.

आयोग घटित करण्याची मागणी तत्कालीन महत्वाच्या राजकीय पक्षांनी आणि घटकराज्य सरकारांनी केली होती. परंतु पूंछी आयोग घटित करणे हा संयुक्त पुरोगामी आघाडीचा सक्रिय निर्णय होता. आधीच्या केंद्र-घटकराज्य संबंधामध्ये लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने पंचायतीराज हा महत्वाचा पैलू मानला गेला.[२१] यादृष्टीने त्रिस्तरीय राज्यव्यवस्थेला अनुसरून करावे लागणारे बदल आणि त्यासोबतच्या शिफारसी लक्षात घेता पूंछी आयोगाचे महत्व अधोरेखित होते. दोन आयोगांमधील दोन दशकांच्या कालखंडात अनेकघडामोडी घडल्या. जम्मू काश्मीर आणि ईशान्य भारतातील प्रदेश यांच्या पुरता मर्यादित असलेला अंतर्गत सुरक्षेचा मुद्दा हा पश्चिम बंगालमधील नक्षल चळवळ आणि अकालींच्या पंजाबी सुभ्यांच्या मागणीमुळे ऐरणीवर आला. यासोबतच संसदेवरील हल्ला, मुंबईमधील बॉम्बस्फोट यामुळे दहशतवादाची भीषणता स्पष्ट होत गेली. १९९० च्या दशकामध्ये पी. व्ही. नरसिंह राव सरकारने महत्वाच्या आर्थिक सुधारणा घडवून आणल्या आणि त्यामुळे जागतिकीकरण आणि उदारीकरण भारतामध्ये रुजू लागले. थेट परकीय गुंतवणुकीवरील निर्बंध काढून टाकणे व त्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे असे प्रयत्न याच काळात सुरू झाले. या दोन दशकाच्या कालखंडात ‘विनाशी राज्यांचा अविनाशी संघ’ ही संकल्पना बदलून त्या जागी ‘अविनाशी राज्यांचा अविनाशी संघ’ ही संकल्पना रूढ होवू लागली. ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर पूंछी आयोगाचे गठन महत्त्वाचे ठरते.

**पूंछी आयोग** [२२] पूंछी आयोगाचा मूळ उद्देश हा केंद्र आणि राज्य संबंधामधील बारकावे तपासणे, तत्कालीन आर्थिक आणि सामाजिक बदल आणि त्यानुसार बदलणाऱ्या गरजा समजून घेणे आणि या सोबतच सरकारिया आयोगाच्या शिफारसींचा अभ्यास करणे आणि ही सर्व पार्श्वभूमी लक्षात

[२१] पूंछी व इतर २०१०, प्रस्तावना पृ. xxi.
[२२] पूंछी व इतर २०१०, पृ. १०५-१५९.

घेऊन शिफारसी करणे हा होता. पूंछी आयोगाच्या काही शिफारसी पुढीलप्रमाणे.

१. राज्यपालाचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असावा. हा कार्यकाल केंद्रातील सरकारच्या मर्जीनुसार बदलला जाऊ नये. संविधानाच्या कलम ६१ मध्ये राष्ट्रपतीच्या महाभियोगाची प्रक्रिया दिलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यपालाच्या महाभियोग प्रक्रियेबाबत तरतूद असावी.
२. नियोजन आयोग आणि वित्त आयोग यांच्यात चांगला समन्वय असायला हवा. वित्त आयोगाने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांच्या गरजा ओळखून त्यानुसार त्या राज्यांना अधिक अर्थसहाय्य द्यावे.
३. आरोग्य, शिक्षण, अभियांत्रिकी आणि न्याय या क्षेत्रांकरिता नव्या अखिल भारतीय प्रशासनिक सेवांची निर्मिती केली जावी.
४. पर्यावरण, परिसंस्था आणि वातावरण बदल यांच्याबाबत प्रभावी निर्णयांकरिता संविधानातील सातव्या अनुसूचीतील संघ सूचित योग्य ते बदल केले जावेत.
५. राज्याराज्यांमधील सत्तासमतोल राखण्यासाठी सर्व राज्यांना राज्यसभेत समान प्रतिनिधित्व देताना लोकसंख्येच्या प्रमाणाचा निकष वापरला जाऊ नये.

# ५ निष्कर्ष

एकराज्य आणि संघराज्य या दोन्ही व्यवस्थेमधील गुणधर्म असणारी भारतीय राज्यव्यवस्था वैशिष्टपूर्ण आहे. १९४७ ते १९६० पर्यंत केंद्रीकरणाकडे असलेला कल नंतर हळूहळू बदलून राज्यांना स्वायत्तता मिळावी आणि बळकट केंद्रासोबत बळकट घटकराज्य यांनी संघ म्हणून काम करावे ही संकल्पना रूढ होऊ लागली.

केंद्रात आणि घटकराज्यांत दोन किंवा अधिक पक्षांची मिळून तयार झालेली युती सरकारे ही काही नवी संकल्पना राहिलेली नाही. दिल्लीतील सत्ता बळकट ठेवण्यासाठी घटकराज्यांतील सत्ता बळकट असावी, हे यशाचे गमक राष्ट्रीय पक्षांसोबत प्रादेशिक पक्षांनीही चांगलेच ओळखलेले आहे. याचाच परिपाक म्हणून घटकराज्यांतील निवडणुकीमध्ये राष्ट्रीय पातळीवरील चेहरा दिसणे, हा नित्यपाठ झालेला आहे.

देशांतील नद्यांच्या पाण्याचे वाटप हा कळीचा मुद्दा आहे. आजही एका राज्यात जास्त पाऊस पडला तर त्याचे परिणाम त्या राज्यातील नदी ज्या ज्या इतर राज्यांमधून जाते त्या राज्यांना भोगावे लागतात. पावसाळ्यात अधिकपाण्याचा विसर्ग करताना इतर राज्यांना योग्य वेळेत इशारा न दिल्याने अनेकदा जीवित आणि वित्त हानी घडून येते. दुष्काळात पाण्याचा मुद्दा अधिक ज्वलंत होतो.

भाषावार प्रांतरचना होऊनही आजवर राज्य पुनर्रचनेची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. आजही भारताच्या विविध भागात भाषिक चळवळी धगधगत आहेत. त्रिभाषासूत्राची संपूर्ण भारतभर प्रभावी अंमलबजावणी करणे अजूनही कोणत्याही सरकारला जमलेले नाही. भारतातील सीमेवरील सुरक्षा आणि अंतर्गत सुरक्षेचा मुद्दा अधिकाधिक जटील होत चाललेला आहे.

वर नमूद केलेल्या समस्यांसोबत कोरोनासारख्या इतरही अनेक अडचणींचा सामना भारत करत आहे आणि भविष्यातही करणार आहे. या सर्व आव्हानांना प्रबळतेने सामोरे जाण्यासाठी केंद्राला घटकराज्यांचे सहकार्य मिळणे गरजेचे आहे. यासाठी घटक राज्यांना स्वायत्तता देणेही गरजेचे आहे.

केंद्र आणि घटकराज्य तसेच राज्याराज्यांमध्ये आपापसात बऱ्याचदा विविध विषयांवर संघर्ष झाला आहे. त्यातील काही निवडक मुद्दे ह्या मालिकेतील पुढच्या लेखात आपण विचारात घेऊ.

# संदर्भसूची

भारताचे संविधान (इंग्रजी-मराठी द्विभाषी आवृत्ती) (२०१४). विधी आणि न्याय मंत्रालय, भारत सरकार.

राजा, के. एच्. चेलुआ (एप्रि. १९९१). “डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲन्ड मेकिंग ऑफ द कॉन्स्टिट्यूशन: अ केस-स्टडी ऑफ़् इंडियन फेडरॅलिझम्”. समाविष्ट: द इंडियन जरनल ऑफ़् पॉलिटिकल सायन्स. २रा अंक ५२. दुवा: https://www.jstor.org/stable/41855548.

कश्यप, सुभाष (२००१). अवर कॉन्स्टिट्यूशन. नवी दिल्ली: नॅशनल बुक ट्रस्ट.

सरकारिया, रणजीत सिंह, बलराम शिवरामन व स. र. सेन (१९८८). सरकारिया आयोग अहवाल. नवी दिल्ली: भारत सरकार.

लक्ष्मीकांत, एम्. (२०१५). इंडियन पॉलिटी. न्यू यॉर्क: मॅकग्रॉ हिल एज्युकेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड.

गुहा, रामचंद्र (२००७). इंडिया आफ्टर गांधी: द हिस्ट्री ऑफ़् द वर्ल्ड्स लार्जेस्ट डेमॉक्रसी. लंडन: पिकाडोर इंडिया.

भारत सरकार का राजपत्र, भाग २, खंड ३, उपखंड (i) (०५ ऑग., २०१९). दुवा: http://egazette.nic.in/WriteReadData/2019/210049.pdf.

कश्यप, सुभाष (२००८). अवर पॉलिटिकल सिस्टम. नवी दिल्ली: नॅशनल बुक ट्रस्ट.

पांडे, अनुभव (०६ फेब्रु., २०१९). फेडरॅलिझम् अंडर इंडियन कॉन्स्टिट्यूशन. दुवा: https://blog.ipleaders.in/what-is-federalism/.

पूंछी, मदन मोहन व इतर (२०१०). कमिशन ऑन सेंटर-स्टेट रिलेशन रिपोर्ट. नवी दिल्ली: भारत सरकार.

# ह्या सामग्रीचा संदर्भ कसा द्याल?

ऐश्वर्या धनवडे (२४ जाने., २०२१). “भारतातील केंद्र-घटकराज्य संबंध”. समाविष्ट: आलोक मराठी नियतकालिक. १ला अंक. बुलढाणा : वर्णमुद्रा प्रकाशन, पृ. ११-२३

## बिबटेक् आज्ञावली

```
@article{आलोकऐश्वर्या,
author={ऐश्वर्या धनवडे},
title={भारतातील केंद्र-घटकराज्य संबंध},
journaltitle={आलोक मराठी नियतकालिक},
date={२०२१-१-२४},
series={१},
note={बुलढाणा : वर्णमुद्रा प्रकाशन}
}
```